


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**॥ आजचा सुविचार ॥**

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

वर्ष : ०६ | अंक : ६९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२२ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# फडणवीसजी तुमच्यात जरा जरी हिंमत असेल तर बिश्नोईला खेचून आणा : उद्धव ठाकरेंचं चॅलेंज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** काल परवा टायगर श्रॉफवर हल्ला झाला. ते चमको लगेच त्यांना भेटायला गेले. हा हल्ला झाल्यानंतर पोलिसांनी तत्परतेने हल्लेखोर पकडले. त्याचं कौतुक करायचं की आणखीन काय करायचं? सुदैवाने त्या पोराचं म्हणून तो वाचला.

पण गोळी जर वर्मी लागली असती, मग ह्यांनी हे गुंड पकडले असते, तर उपयोग काय, चाटायचं आहे? कोणत्या पद्धतीने तुम्ही सरकार चालवताय?, असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. यावेळी त्यांनी साबरमती जेलमध्ये कैदेत असलेल्या लॉरेन्स बिश्नोईला महाराष्ट्रात आणून दाखवा, असं चॅलेंज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं.

संताप याच गोष्टीचा येतो, पोलीस असेल किंवा सर्व संस्था असतील, ह्यांनी केवळ स्वत:ची धुणी भांडी करायचं राहू दिलं आहे, बाकी सर्व कामे संस्थांना दिले आहे. कशाला तुमच्या नाकाबंदी असतात? नवरात्र चालू आहे. आमच्याकडे जरा काही झालं की, पोलीस येतात.

मग या पोलिसांना शस्त्र घेऊन येणारे आरोपी दिसले नाहीत? नाकाबंदीच्या वेळेला नाकामध्ये गोळे कोंबले होते का? ते शस्त्र घेऊन आले कसे? तुम्ही पकडले जरुर पण घात



झाला असता तर कोणत्या तोंडाने तुम्ही टीमकी वाजवली असती? हे शौर्यपदक देण्याच्या लायकीचं नाहीय, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मुळात ते शस्त्र घेऊन आले तेव्हा तुम्हाला कळायला पाहिजे होतं आणि तिकडेच त्यांना उडवायला पाहिजे होतं. तर मी म्हणेल कायद्याचं राज्य आहे. हा महाराष्ट्र आहे. पण कुणाला लाज, लज्जा, शरम काही पडलेलं नाही. आता गेल्याच आठवड्यात आपल्या महाराष्ट्र सरकारने उच्च न्यायालयात दावा केला आहे की, महाराष्ट्र हे शहरी नक्षलवाद्यांचं केंद्र बनलं आहे. महाराष्ट्राच्या कुठल्या शहरी नक्षलवाद आहे?, असा सवाल ठाकरेंनी केला.

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा उल्लेख करत ठाकरेंची टीका**

हे गुंड तुमच्या युपी वगैरे तिथून आले होते. ते येताना कळले नाहीत. त्याच्याहीवर तो बिश्नोई अमित शाहचे सगळे ढोकळा आणि फाफडा साबरतमी जेलमध्ये खात बसला आहे. त्याची गुंड सांगत आहेत आमच्याकडे ७० हजार शुटर आहेत, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

**ठाकरेंचं मुख्यमंत्र्यांना चॅलेंज !**

फडणवीसजी तुमच्यात जरा जरी हिंमत असेल तर जा साबरमतीला आणि तुमचा जो बाप दिल्लीला बसला आहे, त्याच्यासमोर त्या बिश्नोईला खेचून महाराष्ट्रात आणून दाखवा. मग आम च्याकडे गप्पा मारा. पण कुणाला त्याचं काही वाटत नाही. माझ्या शिवरायांच्या महाराष्ट्राला शहरी नक्षलवादाचं केंद्र बोलताना तुमची जीभ झडत कशी नाही?, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्यात केला.

## राज ठाकरे यांनी केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारवर केला जोरदार हल्लाबोल...

**अनेक गोष्टी बाहेर येतील, अशी वेळ येईल की काही काळासाठी देशाला पंतप्रधान नसेल; राज ठाकरेंची भविष्यवाणी...**



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१,मुंबई :** अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणातील गुन्हेगार जेफ्री एपस्टीन याच्यासोबत केंद्रीय मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सरकारविरोधात आक्रमक प्रतिक्रिया उमटत आहेत. मुंबई प्रेस क्लब इथं पत्रकारांशी संवाद साधताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे. पुढील काही दिवसांत अनेक गोष्टी बाहेर येतील. हे आता थांबणार नाही. सरकार चुकांवर चुका करत राहणार. आगामी काळात संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नाही. नीटचं आंदोलन झालं, आता निवडणूक आयोगाविरोधात लोक रस्त्यावर आहेत. नीटच्या आंदोलनात उतरलेल्या सर्वांनीच नीटची परीक्षा दिलेली नव्हती. पण लोकांमध्ये विविध मुद्द्यांवरून सरकारविरोधात राग आहे आणि हा राग व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ शोधले जात आहे, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रात सरकारने नुकताच ३०० हून अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. अजून परिस्थिती खराब होणार आहे. पुढे-पुढे अन्नधान्याच्या टंचाईपासून विविध समस्या निर्माण होतील आणि हे सगळं सरकारला झेपण्यासारखं नाही. मी मध्ये कोणाशी तरी बोललो पण होतो की, एक असा कालावधी येईल, जेव्हा या देशाला पंतप्रधानच नसेल, असा अंदाजही राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

देशात अराजकता पसरवण्याचा प्रयत्न काही लोकांकडून सुरू असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. या आरोपाचाही राज ठाकरे यांनी समाचार घेतला. याच्यात अराजकतेचा काय संबंध आहे? शांततेत आंदोलन करणाऱ्या मुलांवर तुम्ही लाठीचार्ज केला, तुम्ही त्यांना मारलं, पोलिसांच्या गणवेशात तुम्ही तुमच्या पक्षाचे लोक घुसवले, तुम्ही गोंधळ तयार केला. आंदोलक मुलांनी काहीच केलेलं नव्हतं. भाजप जुने दिवस विसरले काय? त्यांनी आतापर्यंत काय-काय केलं? असा खरपूस सवाल राज यांनी विचारला आहे.

या देशात लोकशाही कुठे आहे? अमेरिकेत जे मराठी संमेलन असतं, त्यात मी सांगितलं होतं की, खरी लोकशाही तुम्हाला बघायची असेल तर ती अमेरिकेत आहे. ऑस्करच्या व्यासपीठावर येऊन अभिनेते ट्रम्पविरोधात बोलतात, तरी त्यांच्या चित्रपटांवर बहिष्कार नाही टाकले जात. समीर भाटियाने आता एक डॉक्युमेंट्री केली तर ती हटवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. आपल्या कृतीचा भविष्यात काही परिणाम होईल, काळ सोकवणार नाही ना, याचा विचार प्रत्येक सत्ताधारी पक्षाने करायला हवा, असं राज ठाकरे म्हणाले. दरम्यान, राज ठाकरे यांनी यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांचाही समाचार घेतला. २०१४ साली देशात भाजपची जी सत्ता आली ती नरेंद्र मोदी यांच्यामुळे आली. ती आपल्यामुळे आली असं संघाने समजू नये. त्यामुळे आताही या सत्तेचं काय करायचं हे देशातील जनता आणि मोदी हे पाहून घेतील, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# लासलगाव गॅस टंचाईचा प्रश्न ऐरणीवर !

## प्रशासनाच्या दणक्याने येवला-मनमाडमधून पर्यायी पुरवठा सुरू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** लासलगावसह परिसरात गेल्या १० ते १५ दिवसांपासून निर्माण झालेल्या घरगुती गॅस सिलिंडरच्या तीव्र तुटवड्याची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे. काही वृत्तपत्रात यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध करून ग्राहकांची गैरसोय आणि वितरणातील अडचणी चव्हाट्यावर आणल्यानंतर, निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी तातडीने सूत्रे हलवत या प्रकरणात लक्ष घातले आहे. तसेच हिंदुस्थान पेट्रोलियमच्या (एचपी) अधिकाऱ्यांनीही पुरवठा सुरळीत न झाल्यास संबंधित एजन्सीवर दंडात्म क कारवाईचा इशारा दिला आहे.

**३० हजार ग्राहक प्रभावित, प्रशासनाची प्रत्यक्ष पाहणी...**

लासलगाव परिसरातील जाधव गॅस एजन्सीच्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांना बुकिंग करूनही सिलिंडरसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. ऐन सणासुदीच्या काळात उद्भवलेल्या या समस्येमुळे गृहिणींसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत असून, लासलगावसह निफाड, चांदवड आणि येवला तालुक्यांतील सुमारे ३० हजार ग्राहक यामुळे प्रभावित झाले आहेत.

गॅस टंचाईची माहिती मिळताच तहसीलदारांनी संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र संपर्क होऊ शकल्याने त्यांनी



स्वतः गॅस एजन्सीला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पडताळणी केली. सणासुदीच्या काळात कोणत्याही ग्राहकाला गॅसअभावी अडचण येऊ नये, यासाठी त्यांनी संबंधितांना सक्त सूचना दिल्या आहेत. तसेच स्थानिक पुरवठ्यात अडचणी आल्यास येवला आणि मनमाड येथून गॅस सिलिंडरचा पर्यायी पुरवठा सुरू ठेवण्यात येईल, असे स्पष्ट करत तहसीलदारांनी नागरिकांना दिलासा दिला आहे.

**एचपी प्रशासनाचा दंडात्मक कारवाईचा इशारा**

दरम्यान, हिंदुस्थान पेट्रोलियमचे अधिकारी भूपेन पाटील यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. संबंधित एजन्सीच्या अडचणी दूर करून वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली असून, इतर वितरकांच्या माध्यमातून येत्या दोन ते तीन दिवसांत ग्राहकांना पुरवठा उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्राहकांची गैरसोय दूर करण्यासाठी सिलिंडरच्या टाक्यांची संख्या वाढविण्याचे नियोजनही केले जात आहे. म त्र, निर्धारित मुदतीत एजन्सीचा कारभार सुरळीत न झाल्यास, संबंधित एजन्सीवर दंडात्मक कारवाई करून तिच्याशी संलग्न ग्राहकांचे अन्य एजन्सीकडे हस्तांतरण करण्यात येईल, असा सज्जड इशारा भूपेन पाटील यांनी दिला आहे.

**आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासनाला जाग**

गॅस वितरण व्यवस्था लवकरात लवकर सुरळीत न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन तीव्र 'रस्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा लासलगाव शहर विकास समितीच्या वतीने देण्यात आला होता.

प्रकाश पाटील, संदीप उगले, धर्मेश जाधव, राजेंद्र कराड, चंद्रकांत नेटारे, विकास कोल्हे, शेखर कुलकर्णी, प्रमोद पाटील, उत्तम वाघ, अनिल भावसार, संतोष बोराडे, महेश बकरे, अनिल भागवत आदींसह नागरिकांनी या आंदोलनाचा इशारा देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

सलग अनेक दिवस गॅस सिलिंडर मिळत नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. मात्र, आता तहसीलदारांची प्रत्यक्ष पाहणी आणि एचपी प्रशासनाच्या कारवाईच्या भूमिकेमुळे या प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

# मकरंद पाटील बिनविरोध, पालकमंत्री, ग्रामविकास मंत्री रिंगणात

**दि.२१, सातारा :** भाजपचे खासदार उदयनराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, राज्यसभा खासदार नितीन पाटील यांच्यासह सलग दहा वर्षांहून अधिक काळ संचालक राहिलेल्या तब्बल आठ विद्यमान संचालकांनी शेवटच्या दिवशी जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून माघार घेतली. काठावर मते असल्याने माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी घेतलेली माघार धक्कादायक ठरली. दरम्यान, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि आमदार डॉ. अतुल भोसले यांची जिल्हा बँकेत बिनविरोध एण्ट्री झाली आहे.

आरबीआयच्या निकषामुळे अपात्रतेची टांगती तलवार असल्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी समोर आल्या. सलग दहा वर्षे संचालक असणाऱ्या विद्यमान संचालकांना विश्रांती घ्यावी लागली आहे. बँकेचे ज्येष्ठ संचालक आणि विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी सोमवारीच आपला अर्ज मागे घेतला होता. त्यामुळे आज अन्य आठ संचालकही माघार घेणार हे स्पष्ट होतं.

शिवेंद्रराजे आणि नितीन पाटील यांच्या माघारीमुळे सातारा आणि वाई तालुका सोसायटी मतदार संघातून त्यांच्या निकटवर्तीयांची बिनविरोध संचालकपदी वर्णी



लागली आहे. गृहनिर्माण व पाणीपुरवठा मतदार संघातून उदयनराजेंच्या जागी काका धुमाळ या त्यांच्या कट्टर समर्थकाची बँकेत एण्ट्री झाली आहे. खरेदी-विक्री मतदारसंघातून मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांची बिनविरोध निवड झाली. बँका व नागरी पतसंस्था मतदारसंघातून माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, कृषी प्रक्रिया मतदारसंघातून आमदार डॉ. अतुल भोसले बिनविरोध आणि पहिल्यांदाच संचालक झाले.

आरबीआयच्या निकषामुळे यंदा मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले, खासदार नितीन पाटील, रामराजे निंबाळकर, माजी आमदार प्रभाकर घार्गे या दिग्गजांना फटका बसला आहे. तर माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी विजयाची ठाम खात्री नसल्याने निवडणूक रिंगणातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

जिल्ह्यातील ११ पैकी सातारा, वाई आणि खटाव हे तीन सोसायटी मतदार संघ बिनविरोध झाले. माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या माघारीमुळे कराड सोसायटी मतदार संघ निवडणुकीतील चुरस संपुष्टात आली आहे. पाटण, माण, फलटण या मतदार संघातील लढती चर्चेच्या ठरणार आहेत. पाटणमध्ये पालकमंत्री शंभूराज देसाई (शिवसेना) विरूद्ध सत्यजितसिंह पाटणकर (भाजप), माणमध्ये ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे (भाजप) विरूद्ध बंधू शेखर गोरे (शिवसेना) आणि मनोज पोळ (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष) यांच्यात तिरंगी लढत होईल. फलटणमध्ये रामराजे निंबाळकर यांचे चुलत बंधू संजीवराजे विरूद्ध फलटणचे नगराध्यक्ष समशेरसिंह निंबाळकर, अशी थेट लढत होणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मागील निवडणूक आघाडी सरकारच्या काळात झाली होती. त्यावेळी कराड उत्तरचे तत्कालीन आमदार बाळासाहेब पाटील सहकार मंत्री होते. त्यामुळे त्यांनी कराड तालुका सोसायटी म तदारसंघातून दावेदारी केली होती. डॉ. अतुल भोसले यांच्याकडे २० च्या आसपास मते होती. बाळासाहेबांनी भोसले यांची हात मिळवणी करून विलासकाका उंडाळकरांचे सुपुत्र ॲड. उदयसिंह पाटील यांचा थोडक्या मतांनी पराभव केला होता. मात्र, आत्ताच्या निवडणुकीत चित्र नेमके उलटे झाले आहे. डॉ. अतुल भोसले आणि उंडाळकरांचा पैरा झाला. त्यामुळे माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांना निवडणुकीतूनच माघार घ्यावी लागली आहे.




## पोलिस हुतात्मा दिन !

२१ ऑक्टोबर, हा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला गेला. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.

२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती.

देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात.

दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**- श्याम ठाणेदार**

# नात्यांतील माया पातळ होत चालली आहे!

सख्ख्याचे चुलत झाले की माया पातळ होते आणि पुढे सख्ख्याचे चुलत-चुलत झाले, तर माया आणखीनच पातळ आणि प्रवाही होते, असा सर्वसाधारण समज समाजात प्रचलित आहे. परंतु, आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, सख्ख्या नात्यांतसुद्धा माया पातळ आणि प्रवाही बनत आहे. एकाच आईच्या उदरातून जन्म घेऊनदेखील सख्ख्या भावंडांमध्ये आणि रक्ताच्या इतर नात्यांमध्येही कमालीची दरी निर्माण होत आहे. माणसे म तलबी, लबाड आणि कमालीची स्वार्थी बनत चालली आहेत. गरजा वाढल्यामुळे माणसांमध्ये बदल झाला आहे, हे एव्हाना सर्वांच्या ध्यानात येत आहे.

पूर्वी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मोजक्या व मर्यादित गरजांमध्ये माणसे जीवन जगत होती. आता या गरजांची भूक कित्येक पटींनी वाढली आहे. भाजी-भाकरीला अन्न समजणारी पिढी आता उतारवयात आहे. साधी राहणी, साधे खानपान आणि साधी दिनचर्या आताच्या पिढीला नकोशी झाली आहे. सर्वकाही व्हीआयपी हवे आहे. या व्हीआयपी जीवनशैलीच्या हव्यासापोटी माणसे नातीगोती, खरे-खोटे, चांगले-वाईट, नैतिक-अनैतिक अशा सर्वच गोष्टी विसरत चालली आहेत.

माणुसकी जपावी, एकमेकांना जीव लावावा, मायेने पोटाशी धरावे, या गोष्टी आता हळूहळू लोप पावत आहेत. आता सर्वांची वाटचाल व्यवहारवादाकडे सुरू आहे. 'तू माझ्यासाठी काय केलेस, तेवढेच मी तुझ्यासाठी करणार,' हा सार्वत्रिक समज बनत चालला आहे. इतकेच नव्हे, तर परक्यांप्रमाणे सख्खे नातेवाईकसुद्धा एकमेकांचा डाव धरून बसू लागले आहेत. 'तू माझ्याशी पूर्वी असे केले होतेस; आता मी त्याचा बदला घेणार,' हा विचार मनात ठेवून एकमेकांना टप्प्यात आल्यावर पाहून घेण्याची वाट बघितली जात आहे.

हे सर्व परिवर्तन मागील २५ ते ३० वर्षांत घडत आले आहे. पैशाला प्राप्त झालेले डोंगराएवढे महत्त्व आणि सुखवस्तू जीवनाची लागलेली ओढ माणसांमधील माणूसपण कमी करत आहे. जागतिकीकरणानंतर मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाले. माणसाला माणसाची गरज कमी भासू लागली. हवेहवेसे वाटणाऱ्या गोष्टींचा बाजारात सुळसुळाट झाला.पौष्टिक आहाराची जागा चमचमीत पदार्थांनी घेतली. अंगभर कपडे घालण्याच्या साधेपणाची जागा महागड्या, तोकड्या आणि ब्रँडेड कपड्यांनी घेतली. महागड्या चारचाकी गाड्यांनी तरुणांना भुरळ घातली. सोने हा केवळ अलंकार न राहता श्रीमंती आणि माज दाखवण्याचे प्रतीक बनले. मोठमोठे बंगले आणि आलिशान फ्लॅट्स



हे प्रतिष्ठेचे, तसेच इतरांचे डोळे दीपवणारे प्रतीक बनले.शिक्षणातील विषमता नको तितकी वाढली. आंतरराष्ट्रीय इंग्रजी माध्यम ाच्या शाळांमधील चमकधमक लोकांचे डोळे दिपवून त्यांना आंधळे करू लागली. भरमसाट फी देऊन मुलांना अशा शाळांमध्ये घालण्याची चढाओढ सुरू झाली. एकूणच, सगळे काही आकर्षक आणि महागडे बनत गेले.

भ्रमंती आणि सहलींचे रूपांतर 'एन्जॉयिंग ट्रिप्स'मध्ये झाले. तिथे गाणे, वाजवणे, खाणे-पिणे यांचे फोटो आणि रील्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालू लागले. हे सर्व इतरांमध्ये द्वेषभावना वाढवण्यासही कारणीभूत ठरू लागले.

आलीशान जीवनशैली म्हणजेच खरे जगणे, हा गैरसमज वाढत गेला. त्यातून एकम ेकांना ओरबाडणे, लुटणे आणि फसवणे यांचे नवनवीन मार्ग निर्माण होत गेले. नात्यांमधील विश्वासघात इतका वाढला की, माया अर्थातच एकमेकांवरील प्रेम कधी पातळ झाले, हे सम जलेदेखील नाही.कधीकाळी घट्ट दुधासारखी असलेली प्रेमाची नाती पाणी ओतून पातळ केल्याप्रमाणे बनली. त्यांतील घट्टपणा कमी झाला. ती नाती अधिक प्रवाही झाली. त्यांतील प्रेमाचा गोडवा आणि पोषक तत्त्वे कमी झाली .

हे चित्र आणखी बिघडणार की सुधारणार, हे केवळ समाजमन घडवणाऱ्या सुज्ञ आणि विद्वान व्यक्तींच्या किंवा धोरणे ठरवणाऱ्या राज्यकर्त्यांच्या हातात नाही, तर ते आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे. कारण समाज बदलण्याची सुरुवात स्वतःपासून आणि नात्यांमधील माणुसकी जपण्यापासून होते. पैसा, प्रतिष्ठा आणि सुखसोयी यांना जीवनात महत्त्व जरूर असावे; परंतु त्यांच्यासाठी माणसांमधील प्रेम, विश्वास आणि आपुलकी गमावणे ही खरी शोकांतिका आहे. शेवटी, माणसाच्या श्रीमंतीचे मोजमाप त्याच्याकडे असलेल्या संपत्तीवरून नव्हे, तर त्याने जपलेल्या नात्यांवरून व्हायला हवे. नाती रक्ताने निर्माण होतात; पण ती टिकतात मायेने, विश्वासाने आणि माणुसकीने!

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# चारठाण्यात वस्तीमध्ये अवैध दारू विक्रीचा आरोप! नागरिक त्रस्त, पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२१, चारठाणा (जिंतूर) :** चारठाणा येथे राहत्या वस्तीमध्ये अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. दसऱ्याच्या सुट्टीच्या दिवशीही दारू विक्री सुरू असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे. यासंदर्भात चारठाणा पोलिसांकडे वारंवार निवेदने देऊनही कारवाई होत नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.




वस्तीमध्ये दारू पिण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींमुळे महिलांना, लहान मुलांना तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे. काही ठिकाणी दारू पिणारे लोक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही यामुळे निर्माण होत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**▪ पोलिसांच्या भूमिकेवर नागरिकांचे प्रश्न!**

अवैध दारू विक्रीबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधितांवर कारवाई होत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही तक्रारदारांनी पोलिसांकडून हप्ते घेतले जात असल्याचा आरोपही केला आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

चारठाणा परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अवैध दारू विक्रीची चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**▪ वस्तीतील नागरिकांना दिलासा मिळणार का?**

राहत्या वस्तीमध्ये सुरू असल्याचा आरोप असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे नागरिकांना होणारा त्रास थांबवण्यासाठी चारठाणा पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता या तक्रारींची दखल घेऊन पोलिस प्रशासन काय कारवाई करते, याकडे चारठाण्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शाळकरी मुलांची वाहतूक धोक्यात ! ऑटो,व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा परिसरातील शाळा-महाविद्यालयांमध्ये दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी ये-जा करतात. म ात्र,विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी ऑटो, मारुती व्हॅन आणि इतर वाहनांम ध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसविले जात असल्याच्या तक्रारींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीने (आप) प्रादेशिक परिवहन विभाग आरटीओ पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून विशेष तपासणी म ोहीम राबविण्याची मागणी केली आहे. पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना शाळेत पाठवतात. मात्र, शाळेत ये-जा करताना त्यांच्या जीविताला धोका निर्माण होत असेल तर ही बाब गंभीर आहे. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनाला अपघात झाल्यास निष्पाप मुलांच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार असा सवाल आप'ने उपस्थित केला आह. अपघात झाल्यानंतर चौकशी आणि कारवाई करण्यापेक्षा संभाव्य अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने आधीच सतर्क राहणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियमित देखरेख ठेवून वाहतूक नियमांची प्रभावी अंमल बजावणी करावी अशी मागणी पक्षाने केली आहे. आम आदमी पार्टीने आरटीओ, पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने संयुक्तपणे विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी केली आहे. या मोहिमेत विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या खासगी ऑटो, मारुती व्हॅन आणि इतर वाहनांची प्रत्यक्ष तपासणी करावी, वाहनांमध्ये निर्धारित क्षमतेनुसारच विद्यार्थी बसविले जात आहेत का, वाहनांचे परमिट आणि इतर आवश्यक परवानग्या वैध आहेत का, फिटनेस प्रमाणपत्र व विम्याची वैधता आहे का, तसेच चालकाकडे वैध वाहनचालक



परवाना आहे का, याची पडताळणी करावी याशिवाय, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी असलेल्या नियमांचे पालन होत आहे की नाही याचीही खातरजमा करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची जबाबदारी केवळ वाहनचालकांपुरती मर्यादित नसून शाळा व्यवस्थापनाने केलेल्या वाहतूक व्यवस्थेचाही आढावा घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते का याची संबंधित विभागांनी तपासणी करावी. तसेच पालकांमध्ये सुरक्षित विद्यार्थी वाहतुकी बाबत जनजागृती करून नियमांचे नियमित पालन सुनिश्चित करावे असेही आप'ने म्हटले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा हा केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून पालकांचा विश्वास आणि प्रशासनाच्या जबाबदारीशी संबंधित विषय आहे.

त्यामुळे संबंधित विभागांनी केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून वाहनांची तपासणी करावी आणि नियमित देखरेखीची व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे. यापुढे आरटीओ पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभाग या मागणीवर कोणती पावले उचलतात याकडे खापरखेडा परिसरातील पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# गुडसूर येथे चारा साक्षरता अभियान उत्साहात संपन्न

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२१, उदगीर (लातुर) :** दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करणे, चारा टंचाईवर मात करणे आणि उपलब्ध चाऱ्याचा योग्य वापर करून पशुधनाचे आरोग्य व दुग्धोत्पादन टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने पशुवैद्यकीय चिकित्सालय, गुडसूर यांच्या वतीने सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी दत्त मंदिर चौक, गोदामाजवळ, गुडसूर येथे चारा साक्षरता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाला १०० पेक्षा अधिक पशुपालकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सध्याच्या अनिश्चित पर्जन्यमानाच्या आणि संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा व्यवस्थापनाचे शास्त्रीय तंत्र अवलंबणे आवश्यक आहे. या अनुषंगाने अभियानात पशुपालकांना निकृष्ट व वाळलेल्या चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी युरिया प्रक्रिया, हिरव्या चाऱ्याची साठवणूक करण्यासाठी मुरघास निर्मिती, निकृष्ट चारा सकस बनविण्याचे उपाय तसेच दुष्काळी परिस्थितीत चारा व पशुखाद्याचे योग्य नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच जनावरांना संतुलित आहार देणे, उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर करणे, पशुखाद्यावरील अनावश्यक खर्च कमी करणे आणि जनावरांचे आरोग्य व दुग्धोत्पादन टिकवून ठेवणे याबाबत माहिती देण्यात आली. यासोबतच तचूझ योजना व वैरण विकास योजनेची




माहिती पशुपालकांना देण्यात आली. या अभियानामुळे पशुपालकांमध्ये चारा व्यवस्थापनाविषयी जागरूकता निम ाण होण्यास मदत झाली. दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध चाऱ्याचा प्रभावी वापर करून पशुधनाचे संगोपन करणे आणि पशुपालन व्यवसाय आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता. या अभियानाचे आयोजन पशुवैद्यकीय चिकित्सालय, गुडसूर येथील संस्था प्रमुख डॉ. मयुरेश हलबुर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकारी ज्ञानेश्वर बडे व परिचर इंद्रजीत सोमवंशी यांनी सहकार्य केले. चारा वाचवा पशुधन वाचवा पशुपालक समृद्ध करा! हा संदेश या अभियानाच्या माध्यमातून देण्यात आला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### नवीन बिना बौद्ध विहारात अशोक विजयादशमी साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात अशोक विजयादशमी साजरी उत्साहात साजरी करण्यात आली.

तथागत गौतम बुद्ध, धम्मनायक सम्राट अशोक व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला निर्मला चिमणकर, व गणवीर यांच्या हस्ते माल्यार्पण व पंचशील ध्वजारोहण आणि बुद्ध वंदना घेवून कार्यक्रमाची सुरवात झाली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम अध्यक्ष प्रा. डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी दिग्विजयापेक्षा सम्राट अशोक प्रणित धम्मविजय मानवतेच्या कल्याणासाठी हा धम्मच निर्वाण मार्ग आहे, त्या धम्माचे पालन करण्याचे आवाहन केले. मीना नरेश ढोके व ज्योती गणवीर यांनी गीतांच्या माध्यमातून धम्म गाथा विषद केली. याप्रसंगी भारतीय भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ शाखा नवीन बिन्याचे पदाधिकारी व सदस्य आणि बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्पना वासनिक, संचालन विशाखा ढोके व सारिका तागडे, तर आभार प्रिती गोलाईत यांनी मानले.

### दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी आ.पठारेंचा पुढाकार




**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२१, वडगावशेरी (पुणे) :** दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बळीराजाची दिवाळी गोड करण्यासाठी वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी पुढाकार घेतला आहे. वाढदिवसाचा मोठा उत्सव टाळून त्यांनी सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला.

ज्येष्ठ बंधू स्व. पंढरीनाथ तथा अण्णासाहेब पठारे यांच्या निधनामुळे यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या उपक्रमातून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक लाख रुपयांहून अधिक रक्कम जमा करण्यात आली. तसेच गरजू कुटुंबांसाठी गहू, तांदूळ, खाद्यतेल, तूरडाळ, साखर, मीठ, मसाले आणि इतर किराणा साहित्य संकलित करण्यात आले.

आमदार पठारे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री काळभैरवनाथ विकास प्रतिष्ठान, खराडी यांच्या वतीने वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. या सेवेमुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सराटे वडगाव, टाकळी अ., दादेगाव, आनंदवाडी आणि पिंपरी घाटा या गावांतील गरजू कुटुंबांना लवकरच अन्नधान्य व किराणा किटचे वाटप करण्यात येणार आहे.

या सामाजिक उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानत, गरजूंपर्यंत मदत पोहोचविणे हीच आपली सामाजिक बांधिलकी असल्याचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी सांगितले.

### पारनेरकरांनो, रस्त्याचे काम होऊ द्या

**त्रुटी असतील तर ठेकेदाराला जाब विचारा**

**आमदार, खासदार आणि अधिकाऱ्यांनीही लक्ष द्यावे**



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२१, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात सुपा ते पारनेर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामावरून सोशल मीडियावर दररोज चर्चा आणि टीका होत आहे. मात्र, केवळ आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा संबंधित ठेकेदाराकडून दर्जेदार काम करून घेण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन पारनेर तालुका माहिती सेवा समितीच्या वतीने करण्यात येत आहे. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून ठेकेदाराला जाब विचारावा आणि आवश्यक सुधारणा करून घ्याव्यात. यासाठी आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांनीही पुढाकार घ्यावा. मात्र, ठोस कारणाशिवाय विकासकामात अडथळे निर्माण होऊ नयेत.

रस्ता हा पारनेरच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा आहे. दर्जेदार रस्त्यामुळे बाजारपेठ, व्यापार, दळणवळण आणि ग्रामीण विकासाला चालना मिळेल. त्यामुळे रस्त्याच्या प्रश्नाबरोबरच शेतकरी, युवक, रोजगार, शिक्षण आणि इतर विकासाच्या मुद्द्यांवरही चर्चा होणे गरजेचे आहे.

पारनेरकरांनी कामातील त्रुटी असल्यास पुराव्यानिशी आवाज उठवावा; परंतु काम चांगले होत असेल, तर ते पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे. विरोधासाठी विरोध नको, दर्जेदार विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन पारनेर तालुका माहिती सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे

## तलासरी पोलिसांची महामार्गावर मोठी कारवाई; ६६ लाखांचा गुटखा जप्त

### मुंबई-अहमदाबाद महामार्गावर प्रतिबंधित पानमसाला व सुगंधी सुपारीची वाहतूक करणारा टेम्पो पकडला; चालकाला अटक

अक्षराज : निलेश कासट

दि.२१, तलासरी (पालघर) : महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या पानमसाला, गुटखा व सुगंधी सुपारीची अवैध वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर तलासरी पोलिसांनी कारवाई करत सुमारे ६६ लाख २४ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट, दापचरी परिसरात १९ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

पालघर जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार तलासरी पोलिसांना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका आयशर टेम्पोमधून प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने दापचरी येथील महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट परिसरात सापळा रचला. यावेळी क्व५५/अछ/७२८५ क्रमांकाचा आयशर टेम्पो अडवून त्याची तपासणी करण्यात आली. टेम्पोमध्ये इलेक्ट्रॉनिक साहित्य आढळून आले. मात्र, या साहित्याच्या पाठीमागे तपासणी केली असता महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पानमसाला व सुगंधी सुपारीचा साठा आढळून आला.

या कारवाईत सुमारे ६६ लाख २४ हजार ८०० रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आणि टेम्पोसह एकूण ६६ लाख २४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे पालघर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी टेम्पोचालक रिंकू नरेश यादव (वय ३०, व्यवसाय चालक, रा.औरंगाबाद अहिर, आगवान, बुलंदशहर, उत्तर प्रदेश) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध तलासरी



पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३२४/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रतिबंधात्मक अधिसूचनेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगिता गुजर व नेमणूक तलासरी पोलीस ठाणे करीत आहेत.

ही कारवाई पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे आणि डहाणू विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तलासरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अजय गोरड यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

पालघर जिल्ह्यात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक व विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई सुरू असून, या कारवाईमुळे महामार्गावरील अवैध वाहतुकीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

## सरस्वती शाळेत डिजिटल शिक्षणाची नवी सुरुवात

### नगरसेवक दांभेकर यांच्याकडून डिजिटल बोर्डाची भेट वर्गाचे नूतनीकरणही

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२१, माथेरान :** माथेरान येथील सरस्वती शाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने डिजिटल शिक्षणाची नवी सुरुवात झाली आहे. शाळेचे माजी विद्यार्थी तथा विद्यमान नगरसेवक सचिन विठ्ठल दाभेकर यांनी आपल्या मित्रपरिवाराच्या सहकार्याने शाळेला अत्याधुनिक डिजिटल बोर्ड भेट दिला. विशेष म्हणजे, केवळ डिजिटल बोर्ड भेट देऊन न थांबता त्यांनी वर्गाची दुरुस्ती आणि नूतनीकरणही करून घेतले. विजयादशमीच्या पूर्वसंध्येला झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धतीचा लाभ मिळणार आहे. आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेच्या प्रगतीसाठी योगदान देणे ही प्रत्येक माजी विद्यार्थ्यासाठी अभिमानाची बाब असते. याच भावनेतून नगरसेवक सचिन दाभेकर यांनी सरस्वती शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पुढाकार घेतला.

शाळेतील विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगाशी सुसंगत शिक्षण मिळावे, तसेच आधुनिक शैक्षणिक सुविधांपासून ते वंचित राहू नयेत, या विचारातून त्यांनी डिजिटल बोर्ड उपलब्ध करून दिला.गेल्या वर्षभरापासून ते शाळेतील शिक्षकांच्या संपर्कात होते. शाळेला कोणत्याही सुविधेची आवश्यकता असल्यास आपणास कळवावे, असे आवाहनही त्यांनी शिक्षकांना केले होते. यापूर्वी त्यांनी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून शैक्षणिक मदतीचा हात दिला होता. आता डिजिटल बोर्डची भेट आणि वर्गाच्या नूतनीकरणातून त्यांनी शाळेच्या विकासासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीतही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.

डिजिटल बोर्डमुळे विद्यार्थ्यांना चित्रे, व्हिडिओ, शैक्षणिक प्रात्यक्षिके आणि विविध संकल्पनांच्या माध्यमातून अभ्यास करता येणार आहे. पुस्तकातील माहिती केवळ वाचण्याऐवजी प्रत्यक्ष दृश्यांच्या मदतीने विषय समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.यामुळे कठीण वाटणारे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणे शिक्षकांना शक्य होईल. विद्यार्थ्यांचा अभ्यासातील रस वाढण्यास मदत होईल, तसेच कृतीतून शिकण्याची संधी ही उपलब्ध होईल. डिजिटल बोर्डचा वापर करून अध्यापन अधिक प्रभावी आणि रंजक करण्याचा प्रयत्न शाळेत सुरू झाला आहे. या उपक्रमासाठी नगरसेवक सचिन दाभेकर यांना महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती माननीय सचिन भाऊ अहिर, नवनीत प्रकाशनचे रिजनल मॅनेजर सचिन जगाठिया आणि



विधानसभा संपर्क प्रमुख अनिलजी गोणे यांचे सहकार्य लाभले.

डिजिटल बोर्डच्या उद्घाटनप्रसंगीनगरसेवक प्रसाद सावंत, सीताराम कुंभार, किरण पेमारे, नगरसेविका अनिता रांजणे, अनुसया ढेबे, पत्रकार गिरीश पवार, कुलदीप जाधव, माथेरान उबाठा अध्यक्ष कल्पना पाटील, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी नवनीत प्रकाशनच्या रिजनल मॅनेजर आणि सेल्स मॅनेजर यांनी डिजिटल बोर्डच्या वापराबाबत प्राथमिक माहिती दिली. शाळेतील वाठोरे सर यांना या तंत्रज्ञानाची माहिती असल्याने त्यांनी पहिल्याच दिवसापासून डिजिटल बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविण्यास सुरुवात केली. या आधुनिक सुविधेचा प्रभावी वापर कसा करावा, यासाठी तज्ज्ञ व्यक्ती शाळेत पाठवून शिक्षकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल, असे आश्वासनही नवनीत प्रकाशनच्या प्रतिनिधींनी दिले. डिजिटल बोर्ड आणि वर्गाच्या नूतनीकरणामुळे शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक चांगले होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक ढोले यांनी सचिन दाभेकर आणि त्यांच्या मित्रपरिवाराचे आभार मानले. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षण देणे अधिक सोयीचे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.सध्या दहावीच्या वर्गासाठी डिजिटल बोर्डची सुविधा उपलब्ध झाली आहे.

मात्र, नववीच्या वर्गासाठीही आणखी एका डिजिटल बोर्डची आवश्यकता आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची समान संधी मिळावी, यासाठी माथेरानमधील दानशूर नागरिकांनी पुढे येऊन शाळेला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याध्यापक ढोले यांनी केले

## जन्म-मृत्यू नोंदींच्या विलंबाचा विद्यार्थ्यांसह नागरिकांना फटका

### ऑनलाइन मंजुरी रखडल्याने प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी; नगरसेविका गायकवाड यांचे आरोग्य विभागाकडे निवेदन

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२१, बिलोली (नांदेड) :** बिलोली नगरपरिषद हद्दीतील जन्म-मृत्यू नोंदींची ऑनलाइन प्रक्रिया रखडल्याने विद्यार्थी, पालक आणि इतर नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगरपरिषदेकडून ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदी पाठविण्यात येत असल्या, तरी संबंधित आरोग्य विभागाकडून मंजुरी मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे प्रलंबित नोंदींची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी नगरसेविका अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली



आहे.

जन्म-मृत्यू नोंदी ऑनलाइन पाठविल्यानंतरही मंजुरी मिळण्यास विलंब होत असल्याने नागरिकांना प्रमाणपत्रांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. काही नोंदी तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रक्रियेमुळे नागरिकांची विविध शासकीय व वैयक्तिक कामे रखडत असून, प्रमाणपत्रांच्या स्थितीची माहिती घेण्यासाठी वारंवार नांदेड येथे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होत आहे.

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांमध्ये अडथळे**

जन्म प्रमाणपत्र वेळेत उपलब्ध न झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि इतर शैक्षणिक कामांवर परिणाम होऊ शकतो. प्रमाणपत्राअभावी महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता असल्याने विद्यार्थी आणि पालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दुसरीकडे, मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यास विलंब झाल्यास संबंधित कुटुंबीयांना वारस नोंद, मालमत्ता हस्तांतरण, पेन्शन, विमा दावे आणि इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे जन्म-मृत्यू नोंदींची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे.

**प्रलंबित नोंदींचा तातडीने निपटारा करा**

बिलोली नगरपरिषद हद्दीतील जुन्या व नवीन सर्व प्रलंबित जन्म-मृत्यू नोंदींची तपासणी करून ऑनलाइन प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या नोंदींवर नियमानुसार कार्यवाही करावी तसेच ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणींचे कायमस्वरूपी निराकरण करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

प्रलंबित नोंदींची संख्या व सद्यस्थितीचा आढावा घेऊन संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना निश्चित कालमर्यादा द्यावी. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांसाठी तसेच वारस नोंद आणि मालमत्ता हस्तांतरणासाठी तातडीने प्रमाणपत्र आवश्यक असलेल्या प्रकरणांना प्राधान्य द्यावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांना प्रमाणपत्रांसाठी वारंवार नांदेड येथे जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी बिलोली नगरपरिषद आणि जिल्हा परिषद आरोग्य विभागाने समन्वय साधून प्रक्रिया सुरळीत करावी. तसेच या प्रकरणात केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नगरसेविका अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी केली आहे.

